

भारती विद्यापीठाचे

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद-भारती

A Monthly News Letter

* सप्टेंबर -२०१५ *






२६ सप्टेंबर २०१५

Editorial Committee
Dr.D.G.Kanase - President
Dr.Santosh Mane - Editor -In-Cheif
Mr.Amol Vande - Exicutive Editor

An Initiative by Department Of Computer Science.



## प्राचार्यांच्या लेखणीतून

वसंत ऋतू सरून शरद ऋतूचे आगमन झाले तसेच आपल्या महाविद्यालयाने नुकत्याच नवीन दशकात प्रवेश केला असून आपण सर्वजण आपल्या भारती विदयापीठ संकुलाचे सदस्य म्हणून हा प्रवास अधिक उज्ज्वल रित्या पुढे चालू ठेवण्यासाठी कटिबद्ध आहोत

या महिन्यामध्ये महाविद्यालयाच्या त्रिदशक पूर्ती चा भव्य सोहळा आयोजित करण्याचे योजिले असून आपण सर्वजण त्याचे साक्षीदार होणार आहोत ,सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विदयापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष मा.डॉ.अरुण निगवेकर सर् तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ,नाशिक यांचे कुलगुरू मा.डॉ .माणिकराव साळुंखे सर् याचसोबत कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भारती विदयापीठ परिवाराचे प्रमुख मा.डॉ.पतंगराव कदम साहेब व भारती विदयापीठाचे कार्यवाह मा.डॉ.विश्वजीत कदम आणि भारती अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू मा.डॉ.शिवाजीराव कदम सर् यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे .

या देदीप्यमान सोहळ्यास उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचे आवाहन करीत आहे .

**- प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे**

## डॉ .पतंगराव कदम महाविद्यालयातील भौतिकशास्त्र आणि संख्याशास्त्र विभागाचा उच्चांकी निकाल

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१४-१५मध्ये झालेल्या बी. एस्सी.३ भौतिकशास्त्र व संख्याशास्त्र या विषयाचा भारती विद्यापीठाच्या डॉ .पतंगराव कदम महाविद्यालयाचा उच्चांकी निकाल लागला असून यशस्वी निकालाची परंपर जोपासली आहे . संख्याशास्त्र विभागाची कु .दांडेकर चैत्राली या विद्यार्थीनीने ९८% गुण प्राप्त करून शिवाजी विद्यापिठाच्या संख्याशास्त्र विभागात प्रथम क्रमक प्राप्त केला आहे . भौतिकशास्त्र विभागाची कु .सलोनी शब्बीर पठाण या विद्यार्थीनीने ९८% गुण प्राप्त केले आहेत

## डॉ .कदम महाविद्यालयाचे टी.एफ.ओपन सायकलिंग स्पर्धेत यश

स्वातंत्र्यदिनानिमित्त हैदराबाद येथे पार पडलेल्या टी.एफ.ओपन सायकलिंग स्पर्धेत येथील डॉ .पतंगराव कदम महाविद्यालयातील शाहीद अहमद शब्बीर जमादार याने प्रथम क्रमांक पटकावला . या स्पर्धेत विविध राज्यातून ५० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.जमादार हा बी .एस्सी भाग ३ मध्ये शिकत आहे .त्याने ४ राष्ट्रीय ,४ राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट यश मिळवले आहे .हैद्राबाद येथे झालेल्या या स्पर्धेत ८० कि.मी रोड सायकलिंग स्पर्धेमध्ये त्याने यश मिळवून २६ हजार रुपयांच्या बक्षिसासह सुवर्णपदक मिळवले .त्यांच्या या यशबद्दल महाविद्यालयाचे प्रा.डॉ .डी.जी.कणसे यांनी त्याचा सत्कार केला.यावेळी प्रा.एम.एच.पाटील,प्रा .स्मिता जगताप ,डॉ,संतोष माने यांच्या सह प्राध्यापक व शिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले.

भारती विद्यापीठाचे


# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

- NEWS LETTER -

September-2015 • संकेतस्थळाच्या माध्यमातून जगभर सर्वत्र उपलब्ध • संवाद– भारती



Founder : Dr.Patangaro Kadam




## काळजावर लिखाण करणे हीच खरी सृजनशीलता : कांबळे

**ज्येष्ठ साहित्यिक मा.उत्तम कांबळे यांचे व्याख्यान उत्साहात संपन्न**

**दि.९ सप्टेंबर २०१५**

माणसाच्या आयुष्याला गती देण्याचा विचार हा पुस्तकातून प्राप्त होतो. जीवनात निर्माण होणाऱ्या प्रत्येक समस्येविरूद्ध लढण्याचे बळ, ताकद ही पुस्तकातून, साहित्यातून मिळते. वेदना आणि संवेदना या वैश्विक असल्यामुळे माणसाने



त्या लेखणीतून मांडल्या पाहिजेत .वेदना आणि प्रतिभा यांच्या संगमातून साहित्याची निर्मिती होत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी कागदावर लिखाण करण्यापेक्षा सुंदर शब्दाचे लिखाण काळजावर करणे हीच खरी सृजनशीलता असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी केले.

सांगली येथील

.... पृष्ठ क्र.४ वर



## एनएनएसच्या विद्यार्थिनीनी बांधल्या चालकांना राख्या!

**दि.१ सप्टेंबर २०१५**

सांगली : एस.टी., टेम्पो, ट्रकसह अन्य वाहनांच्या चालक-वाहकांना आपल्या कामाच्या पद्धतीमुळे कुटुंबाबरोबर कोणताही सन साजरा करता येत नाही. मात्र, समाजातील काही व्यक्ती असे आहेत की ते या घटकांना सणासुदीमध्ये सहभागी करून घेतात. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्याचे काम करतात. असाच उपक्रम भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या एनएनएस (राष्ट्रीय सेवा योजना) च्या विद्यार्थिनीनी राबवला.

रक्षाबंधनानिमित्त सांगलीवाडी येथील टोलनाका परिसरात महाविद्यालयाच्या एनएनएसच्या विद्यार्थिनीनी एस.टी. चे चालक-वाहक,ट्रकचालक-क्लीनर,टेम्पोचालकाना राखी बांधली.यावेळी चालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.जी कणसे उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी प्रा.टी.आर.सावंत,डॉ.जया कुऱ्हेकर यांच्या संयोजनाखाली हा अनोखा रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# शिक्षक दिन | ५ सप्टेंबर २०१५

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन' हे भारताचे माजी राष्ट्रपती व नामांकित शिक्षणतज्ज्ञ हाते. डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन ( ५ सप्टेंबर १८८८ तिरुत्तनी, तमिळनाडू - १७ एप्रिल १९७५) हे भारताचे भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती होते.

त्यांच्या कार्यकाळ (इ.स. १९५२ - इ.स. १९६२) असा आहे. त्यांचा जन्म दक्षिण भारतात तिरुत्तनी या ठिकाणी झाला. हे गाव चेन्नई (मद्रास) शहरापासून ईशान्येला ६४ किमी अंतरावर आहे. राधाकृषणन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस भारतात शिक्षक-दिन म्हणून साजरा केला जातो.
पाश्चात्त्य जगताला भारतीय चिद्वादाचा तात्त्विक परिचय करून देणारा भारतावरील ब्रिटिश सत्ताकाळातला महत्वाचा विचारवंत म्हणून राधाकृष्णन यांना ओळखले




जाते.भारतीय तत्त्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून ते ऑक्सफर्डमध्ये नावाजले गेले. त्यांच्या कार्याचे महत्त्व जाणून ऑक्सफर्ड विद्यापीठानेत्यांच्या नावाने 'राधाकृष्णन मेमोरियल बिक्वेस्ट' हा पुरस्कार ठेवला आहे.
राधाकृष्णन यांच्या जीवनात तीन प्रमुख प्रश्न होते. पहिला प्रश्न असा की, नीतिमान पण चिकित्सक, विज्ञानोन्मुख पण अध्यात्मप्रवण असा नवा माणूस कसा निर्माण करता येईल? या दृष्टीने शिक्षणाचा काही उपयोग होऊ शकेल का? दुसरा प्रश्न असा होता की, प्राचीन भारतीय तत्त्वचिंतन सर्व जगाला आधुनिक भाषाशैलीत, आधुनिक पद्धतीने कसे समजावून सांगता येईल? भारतीय तत्त्वचिंतनाचे वैभव जगाला नेमकेपणाने कसे सांगावे? कसे पटवून द्यावे? तिसरा प्रश्न असा होता की; मानव जातीचे भवितव्य घडवण्यासाठी सांस्कृतिक संचिताचा उपयोग किती?' कुणाशीही ते याच तीन प्रश्नांच्या अनुरोधाने बोलत, असे नरहर कुरुंदकर लिहितात.

भारतीय राष्ट्रीय शिक्षक दिन : ५ सप्टेंबर
जागतिक शिक्षक दिन : ५ ऑक्टोबर
इतर देशांचे शिक्षक दिवस

अल्बेनीया ७ मार्च
लेबेनॉन ९ मार्च

मलेशिया १६ मे
चीन १० सप्टेंबर
तैवान २८ सप्टेंबर
पोलंड १४ ऑक्टोबर
ब्राझील १५ ऑक्टोबर
झेक प्रजासत्ताक, स्लोव्हेकिया २८ मार्च
थायलंड १६ जानेवारी



पृष्ठ १ वरून | **काळजावर लिखाण करणे हीच खरी सृजनशीलता : कांबळे**


भारती विदयापिठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने आयोजित **'उगवतिचे जग'** या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून विध्यार्थांशी संवाद साधताना उत्तम कांबळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननिय संचालक डॉ. एच. एम. कदम होते. प्रा. वैजनाथ महाजन, शेखर जोशी, प्रा. एम. एच. पाटील, प्रभा पाटील, डॉ. संतोष माने यांची उपस्थिती होती. आपल्या ओघवत्या शैलीमध्ये उत्तम कांबळे दोन तास विद्यार्थींशी सुसंवाद साधत असताना विद्यार्थ्यांना भावनिक व आनंदी बनवत आपले अनमोल विचार आपल्या जीवनाचा संघर्ष व आयुष्यात स्वप्न पूर्ण करण्यासाठीची प्रयत्नाची पराकाष्टा त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. यावेळी ते बोलताना म्हणाले कि, बऱ्याच वेळा पालक आपली स्वप्न मुलांवर लादतात. आयुष्यातला कोणताही प्रश्न जगून लढून सोडवायचा असतो, मरून नव्हे. स्वप्न पाहतानाही नेमकेपणाने विचार करायचा असतो. डोळ्यात मावतील एवढी स्वप्न बघायची असतात. जय-पराजय, यश-अपयश आणि उजेड-अंधाराच्या कल्पना समजून घेण्याची पूर्वअट असते. अपयश म्हणजे स्वतःला सूक्ष्मपणे पाहण्याची एक संधी असते ती गमावता कामा नये.

कार्यक्रमाची सुरवात भारती विदयापीठ गीताने झाली. प्रा. डी. जी. कणसे यांनी स्वागत व प्रास्थाविक केले. तर सुत्रसंचालन प्रा. सूर्यकांत बुरूंग यांनी केले. प्रा. प्रभा पाटील यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विध्यार्थी यांच्यासह सांगली परिसरातील रसिक श्रोते उपस्थित होते.

## महाविद्यालयात जागतिक ओझोन दिन साजरा

**१६ सप्टेंबर २०१५**

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालात भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिन इको फ्रेंडली गणेश फेस्टिवल पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. कणसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. संतोष माने, प्रा. प्रभा पाटील, प्रा. प्रदीप डिकुळे, प्रा. अरुण जाधव, डॉ. अमित सुफले, प्रा. रुपाली माने व विद्यार्थी उपस्थित होते .









YIN च्या सदस्य नोंदणी प्रसंगी मा.प्राचार्य व इतर मान्यवर



हिंदी दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी मा.प्राचार्य व इतर मान्यवर



ओझोन दिनाच्या प्रसंगी मा.प्राचार्य व इतर मान्यवर



मातोश्री बयाबाई कदम यांना अभिवादन करताना मा.प्राचार्य व इतर







उगवतीचे जग - प्रमुख अतिथी मा.उत्तम कांबळे सर





मा.उत्तम कांबळे सर् यांच्यासह मा.प्राचार्य व इतर मान्यवर






## ACTIVITY OF MICRO- ENVIRON CLUB - 2015-16



27th September, 2015

**Publication of book on**
**"Immunology and Serology",**

**authored by**
**Dr. Mrs. Jaya Vikas Kurhekar,**
**for B.Sc. III, Microbiology, Paper X, Semester V, at the hands of Hon. Principal Dr. D. G. Kanase.**

## तरुणांना कृतीशील समाजकार्याची संधी मिळतेय : डॉ.डी.जी.कणसे | संपादक आपल्या भेटीला कार्यक्रम उत्साहात

**८ सप्टेंबर २०१५**

आजच्या तरुणांनाकृतीशील समाजकार्याची संधी मिळत आहे. ती तरुणांनी घ्यावी, असे आवाहन भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी केले. महाविद्यालयामध्ये संपादक आपल्या भेटीला हा उपक्रम पार पडला.




यावेळी डॉ. कणसे बोलत होते.

यावेळी प्रा. टी. आर. सावंत, डॉ. जया कुर्हेकर, प्रा. यू. ए. देसाई, पद्माकर जगदाळे, प्रा. श्रीकृष्ण मोहिते, प्रा. विकास आवळे, प्रा. पी. एन. गायकवाड आदींसह महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस) चे विध्यार्थी-विद्यार्थीनीसह अन्य मान्यवर उपस्थित होते. , तस्मया मुजावर, सायली खोत, क्रांती आटुगडे, नीलम पाटील आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले. नेहा खुजत हिने आभार मानले




**Student Reporters:**

1.Mr.Desai Shubham B.
2.Pujari Keshav N.
3. Patil Nilam R.
4.Khot Sayali B.
5. Kaware Bhushan B..
6.Hirugade Manoj S.

**|| आवाहन ||**

सर्व शिक्षक व विद्यार्थांना सदर "संवाद -भारती " न्यूज लेटर मध्ये आपले किंवा आपल्या विभागाचे साहित्य ,लेख , प्रकाशित करण्यासाठी dpkm.newsletter@gmail.com या ई-मेल वर साहित्य पाठवावे .

प्रती ______________________

______________________

• Sanvad-Bharati : Monthly News Letter •
(For Private Circulation Only)
Dr.Patangrao Kadam Mahavidyalaya,Sangli
dpkm.newsletter@gmail.com
dpkmsangli.bharatividyapeeth.edu